155

Reg no. MAH/MAR/03261/13/1/2018 post no. L2/MH/MR-RGD/RNP-35/11

रायगड टाइम्स

वर्ष | ५ | अंक | १५१ | पाने | ८

25 sept

मुंबई, दिनांक २५ सप्टेंबर २०१४

www.raigadtimes.co.in / raigadtimesfacebook.com

जिल्ह्याचे हक्काचे व्यासपीठ

मूल्य - ३ रु.

तिसरी मुंबई

नवी मुंबई, पनवेल, उरण परिसर

बातम्या पान पान ६

'मनी गुरु'

शेअर मार्केट मध्ये पैसे गुंतवा व महिना १०% कमवा.

डी मॅट अकाउंटची गरज नाही.

संपर्क

डी. एस. पी. सिक्युरिटीज प्रा. लि., बी विंग, रूम नं. ५, पहिला मजला, आर. बी. बी. आर. इंडस्ट्रीज, अंबिवली.

फोन : [illegible]

ग्रामीण महिलांनी बनविलेल्या उत्पादनांना देशभर मागणी

पाली । गृहउद्योगातील महिलांना प्रोत्साहनपर विविध पुरस्कारांद्वारे गौरविण्यात आले.

महिला गृह उद्योगाचे उद्घाटन प.पु. पण्डाबीच्या प्रमुख उपस्थितीत उद्योगपती बीरीन बाविशी व नित्ता बाविशी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी श्रमिक नारी उद्योग समुहाच्या संचालिका सिमी थापर, मिता हंसाली, पुनिता अजमेरा, शिल्पा शाह, श्रुती मेहता, प्रानलाल शाह, बीरीन सावला या मान्यवरांसह आश्रमाचे अनेक मुमुक्षु यावेळी उपस्थित होते.

महिला गृह उद्योगाच्या उत्पादनांचे ब्रँन्ड नेम थाप्रि असे ठेवण्यात आले आहे. थाप्रि म्हणजे सेवा असा अर्थ होतो. या उद्योगात दिवाळी करीता लक्ष्मीचे विविध दिवे, मुखवटेवाले पॉकिंग, चॉकलेट पॉकिंग आणि विविध चवीचे खाकरे असे उत्पादन महिला उद्योगात घेतले जात आहे. आज सुमारे पन्नास महिला या उद्योगात श्रमिक नारी संघाच्यावतीने काम करीत आहे. ग्रामीण भागातील अशिक्षित महिलांना काम शिकवुन त्या ना रोजगाराची संधी आणि आर्थिक विकास घडवुन आणण्यासाठीचा प्रकल्प श्रीमद राजचंद्र आत्मतत्व रिसर्च सेंटरच्या माध्यमातुन केला जात आहे.

गणपतीचे पीठ ते खाकरे निर्मिती पर्यंत अनेक टप्पे या प्रक्रियेत आहे. महिलांनी हे पॉकिंग पर्यंतची कामे हया महिला पदाधीकारी करत आहेत. आज हया उत्पादनांना देशभर मागणी आहे म्हणुन येत्या काही वर्षात या उद्योगाचा विकास करण्याच्या दृष्टीने एक हजार महिलांना काम मिळेल व आंतरराष्ट्रीय स्तरावर श्रमिक नारी संघाचे नाव अभिमानाने घेतले जावे असे स्वप्न बाळगुन कामाला लागा, बंधु नका कारण जो मांगला त्याचा विकास खुंटला असे प्रोत्साहन व प्रेरणादायक आवाहन प.पु.प्रविण मेहता यांनी पण्डाबी यांनी यावेळी केले.

यावेळी महिला कामगारांना विविध पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. आमच्या अशिक्षितपणाला योग्य मार्गदर्शन व प्रेम देऊन या उद्योगात सन्मानाने काम करण्यासाठी दिलेले सर्व संचालिकांनी योगदान हे खुप मोठे आहे. आम्हांला रोजगार व मुलांना शिक्षण आणि परीवाराचे आरोग्य सर्वच काही सोयमुविधा या इथ झाली मिळत असल्याचा आनंद यावेळी या महिलांनी व्यक्त केला. आदिवासी व आर्थिकदृष्टया कमकुवत असलेल्या पराडीत विद्यार्थ्यांना उत्तम शिक्षण मिळावे म्हणुन आश्रमातले बालवाडी पासुन इंग्रजी माध्यमाची शाळा काढण्यात आली. सीम मुलांच्या उपस्थितीसाठी पासुन सुरुवात झालेल्या या शाळेत आज चारशे पन्नास विद्यार्थी शिक्षण घेत आहे. या शैक्षणिक उपक्रमाचे प्रमुख डॉ. जोशी यांचे आचार्य पण्डाबीच्या हस्ते गौरव करण्यात आला. ग्रामीण भागातुन या विद्यार्थ्यांना शाळेत आणण्यासाठी खाटी स्कुल बसची व्यवस्था करण्यात आली आहे. महिला गृह उद्योगातील महिलांसाठी स्वतंत्र बसची व्यवस्था करण्यात आली. या नव्या बसचे उद्घाटन यावेळी करण्यात आले.

दुर्गम भाग असलेल्या या वाडयावाडयांत आरोग्य सेवा देण्याच्या उद्देशाने आश्रमामार्फत फिरता दवाखाना सुरु करण्यात आला होता. यात मिळालेला प्रचंड प्रतिसाद बघता पराडी येथे क्लिनिक उघडण्यात आले. यात पुर्वीपासुन नामांकित डॉक्टर कान नाक घसा, त्वचा रोग, स्त्रीआरोग्य असे विविध आजारांवरील सेवा देण्याचे काम करीत आहेत. तालुक्यात सर्व सोयीनीयुक्त प्राथमिक आरोग्य केंद्र आश्रमातर्फे सुरु करण्याचा प्रयत्न असल्याची माहिती डॉ. होरा प्रोहन यांनी दिली.

श्रमिक नारी संघातर्फे सुरु झालेल्या व्यवसायाचे महिला गृहउद्योगात रूपांतर

पाली । बातमीदार । सुधागड तालुक्यात परळी घोटावडे येथे दहा वर्षांपूर्वी श्रीमद राजचंद्र आत्मतत्व रिसर्च सेंटर प. पू. प्रविण मेहता यांच्या प्रेरणेने सुरु झाले. स्वत:ची परिपूर्ती आत्मज्ञानाने कशी प्राप्त करून घेता येते याचे संशोधन व साध्य असा या आश्रमा मागील हेतु होता. या बरोबरच ग्रामीण भागातील महिलांना आर्थिकदृष्टया सक्षम बनविण्यासाठी त्यांना काम उपलब्ध करून देण्याच्या कल्पनेतुन श्रमिक नारी संघाची स्थापना करण्यात आली होती. दोन महिलांच्या माध्यमातुन गुजराथी आहारातील खाकरा पदार्थ बनविण्याचे कामास सुरुवात झाली. आज या व्यवसायाचे रूपांतर महिला गृह उद्योगात होत असल्याचा आनंद आहे असे प्रतिपादन श्रमिक नारी संघाच्या संचालिका सिमी थापर यांनी केले.